MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318

*Vidyawarta*®
Peer-Reviewed International Journal

Oct. To Dec., 2021
Special Issue

01





रयत शिक्षण संस्थेचे,
एस.एम.जोशी कॉलेज, हडपसर, पुणे-२८.
नॅक-ए ग्रेड, संलग्न सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

रयत शिक्षण संस्थेचे,
एस. एम. जोशी कॉलेज, हडपसर, पुणे-२८.
मराठी विभाग आयोजित
आंतरराष्ट्रीय वेबिनार

# विषय:मराठीतील १९६०नंतरचे विविध वाङ्मयीन प्रवाह व सद्य:स्थिती

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका
Impact Factor 3.102 (IIJIF)
विद्यावार्ता

प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे

**प्रमुख संपादक**
प्रा.डॉ.राजेंद्र ठाकरे
प्रा.डॉ.अतुल चौरे

**सहाय्यक संपादक**
प्रा.डॉ.नम्रता मेस्त्री
प्रा.डॉ.संदीप वाकडे

शनिवार दि.११ सप्टेंबर २०२१

❖ **विद्यावार्ता** या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned by CamScanner

79) भारतीय मुस्लीम महिलांचे प्रश्न: स्वरूप आणि व्याप्ती
**सुभाष अडावतकर, मुंबई** ||388

80) भाऊ पाध्येंच्या कथेतील महानगरीय जीवनाचे चित्रण
**प्रा. सुखदेव विष्णू कोल्हे, लोणंद** ||394

81) आदिवासी कवितेची वाटचाल
**डॉ. लांडे एस. डी., पनवेल** ||402

82) १९६० नंतरच्या साहित्यातील नियतकालिकांचे कार्य
**प्रा. मच्छगंधाली नितीन तारळेकर, जि–सांगली** ||405

83) १९६० नंतरच्या मराठी कथा वाङ्मयप्रकाराची स्थितीगती
**प्रा. डॉ. छाया शशिपाल शिंदे, नाशिक** ||409

84) अर्वाचीन मराठी कालखंडातील शैक्षणिक परिवर्तन
**प्रा. तुकाराम भिवसेन जाधव, जि. अहमदनगर** ||414

85) १९८० नंतरच्या ग्रामीण कादंबरीची सद्य:स्थिती
**प्रा.सचिन पोपट सवने, सावळज** ||416

86) ग्रामीण साहित्यातील स्त्री विषयक जाणिवा
**प्रा. मोरे भास्कर निवृत्ती, जिल्हा–अहमदनगर** ||419

87) डॉ. आंबेडकरांनी स्थापन केलेल्या 'प्रबुद्ध भारत' नियतकालिकाचे वाङ्मयीनवेगळेपण
**वानखडे अमरदीप शामराव, औरंगाबाद** ||423

88) १९६० नंतरचे ग्रामीण साहित्यातील स्त्री चित्रण
**डॉ. वंदना विनायक नढे, जि. पुणे** ||428

89) ग्रामीण साहित्य चळवळीचे योगदान
**डॉ. संभाजी शिवाजी जाधव, जि. नांदेड** ||430

90) साठोत्तरी व नव्वदोत्तरी दलित आत्मकथने : एक आकलन
**प्रा.विजयकुमार घोडके & डॉ.राजेंद्र ठाकरे, पुणे** ||435

91) बिनपटाची चौकट स्त्री आत्मकथनातील अनाथ जीवन एक अनुभव
**प्रा.कल्पना तबाजी रोकडे, जेजुरी** ||440

www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com



Scanned with CamScanner
Scanned by CamScanner

भरण्यासाठी डोंगर दऱ्या खोऱ्यात भटकणारी माणस माणुसकीला कशी जपतात एकमेकांची भूक जाणणारी, प्रेम आणि जिव्हाळा जपणारी कशी निसर्गाशी एकरूप होतात. त्यांच्या जगण्यातील आदर्श हेच खऱ्या अर्थाने मानवी तत्वज्ञान असल्याचा संदेश या कवितांतून मिळतो.

**संदर्भसूची :**

1. लोहकरे संजय, 'पानझडी', अक्षता प्रकाशन, पुणे,२००१

2. आत्राम, कविता–काजवा' कविता प्रकाशन, धुळे 7 मे २०१०

3. रोंगटे तुकाराम, 'आदिवासी कवितेचा उषःकाल आणि सद्यस्थिती', संस्कृती प्रकाशन,पुणे २००७

4. लोहकरे संजय, 'कवी आणि कविता' मेधा पब्लिशिंग हाउस, अमरावती,२००४

5. गारे गोविंद, 'अनुभूती' आदिम–साहित्य,पुणे,१९९४

❑❑❑

**82**

# १९६० नंतरच्या साहित्यातील नियतकालिकांचे कार्य

**प्रा. मच्छगंधाली नितीन तारळेकर**
श्री.आर.आर.पाटील महाविद्यालय, सावळज,
ता– तासगाव, जि–सांगली

**********

**प्रस्तावना –**

सन १९६० नंतर सर्वच क्षेत्रात मोठा बदल झालेला दिसतो. मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रामध्ये ही वेगळे प्रवास निर्माण झालेले दिसतात. सर्वसामान्य लोकांपर्यंत विविध माहिती पोहोचवण्यासाठी नियतकालिकांनी पुढाकार घेतलेला दिसतो.सामाजिक,सांस्कृतिक,राजकीय पातळीवरील घडामोडी साहित्यरुपातून नियतकालिकातून प्रकाशित होत होते. मराठीतील पहिले नियतकालिक हे बाळशास्त्री जांभेकरांचे 'दर्पण'होते . सन १८३२ मध्ये त्यांनी सुरु केले होते. सामाजाचे प्रबोधन करण्याच्या हेतूने नियतकालिकांची सुरुवात झालेली दिसते.या नंतरच्या काळातही अनेक नियतकालिके निघाली. त्यामधील बरीच नियतकालिके ही साहित्याला वाहिलेली होती. यातून कथा,कादंबरी ,वैचारिक लेख, निबंध यांचे प्रकाशन केले जात होते. समाजतीन सर्व स्थरातील लोकांपर्यंत नियतकालिकाद्वारे माहिती पोहचवली जात होती. या काळात ठराविक विषयला अनुसरून साहित्याचे लेखन केले जात होते.एक चाकोरीबद्ध साहित्य यातून निर्माण झालेले दिसते.त्याबरोबरच प्रस्थापित साहित्याचा मोठा पगडा साहित्यावर होता.त्याच त्या चौकटीतील सहित्य नियतकालिकातून प्रकाशित होत होते. पण



Scanned with CamScanner
Scanned by CamScanner

१९६० नंतर ही स्थिती बदलली. समाजामध्ये जसजसे नवे बदल घडत गेले. तसा बदल मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रात झाला.परंपरेने चालत आलेले वाङ्मय मागे पडले. नव्या विषयाचे व आशयाचे वाङ्मय निर्माण झाले. मराठी वाङ्मयाची नव निर्मिती सन १९६० नंतर झाली. ती पुढीलप्रमाणे पाहू.

**नियतकालिकांचे कार्य:—**

मराठी साहित्यात नवीन आशय व विषय येऊ लागले होते. नव्या संकल्पान समाजात रुजू होऊ पाहात होत्या.प्रस्थापित साहित्याची कोंडी फोडून नवनिर्मिती होऊ लागली. साहित्यातून ज्वलंत प्रश्न मांडले जाऊ लागले. सर्व स्थरातील लोकांच्या जीवन जाणिवा साहित्यातून प्रकट होऊ लागल्या. अशा साहित्याला नियतकालिकातून स्थान मिळू लागले. नवीन लेखकांना त्याचे विचार मांडण्याची संधी नियतकालिकांनी निर्माण करून दिलेली पहावयास मिळते. काही नियतकालिके ही विविध विषयाला वाहिलेली आहेत. वाङ्मयाच्या अनेक प्रकारातील तसेच प्रवाहातील साहित्य प्रकाशित करण्याच्या हेतूने नियतकालिके निघालेली दिसतात.कथा,कविता ,कादंबरी,समीक्षा,वैचारिक लेख असे साहित्य निर्माण झाले. हे साहित्य नियतकालिकांद्वारे सर्व सामान्य लोकांपर्यंत पोहचवले जात होते.

मराठी नियतकालिकाच्या क्षेत्रात वाङ्मयीन चळवळी निर्माण झाल्या. यामध्ये विविध नियतकालिकांचा समावेश होता. या नियतकालिकांनी परंपरेने चालत आलेल्या साहित्याला छेद देण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. तसेच ज्वलंत प्रश्नांवर निर्माण झालेले साहित्य प्रशिद्ध केले. विविध साहित्य प्रकारासाठी म्हणजेच कथा साहित्यासाठी ,समीक्षेसाठी ,कवितेसाठी वाहिलेली नियतकालिके प्रकाशित होऊ लागलेली दिसतात. या नियतकालिकातून संवेदनशील साहित्य प्रकाशित केले जाते होते. सन १९७५ नंतर मराठी साहित्यामध्ये विविध प्रवाह निर्माण झाले. उदा. ग्रामीण,दलित,स्त्रीवादी, आदिवासी साहित्य. या प्रवाहातील साहित्य हे त्या त्या गटातील लोकांच्या जीवन जाणीवा मांडणारे आहे. काही नियतकालिकांचा थोडक्यात परामर्श घेऊ.

**आलोचना:—**

मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रातील मोलाची कामगिरी करणारे मासिक प्रकाशित झाले. ते म्हणजे 'आलोचना'होय. हे नियतकालिक वसंत दावतर यांनी सन १९६२ मध्ये सुरु झाले. या नियतकालिकाने विविध विषयांच्या समीक्षेवर भर दिला होता. त्यामध्ये मराठी साहित्य संमेलनांच्या अध्येक्षांनी केलेय भाषणांची चिकित्सा , विविध ग्रंथांवरची परीक्षणे तसेच साहित्याची समीक्षेच्या दृष्टीने चर्चा हे नियतकालिक प्रसिद्ध करत होते. केवळ समीक्षासाठी वाहिलेले हे नियतकालिक आहे.

**ललित :—**

जानेवारी १९६४ साली 'ललित'मासिक प्रकाशित झाले. याचे संपादन अशोक कोठावळे यांनी केलेले आहे. या नियतकालिकाने मराठी वाङ्मयाला महत्त्वाचे स्थान दिलेले आहे.ग्रंथप्रेमी, वाचकवर्ग निर्माण करण्याच्या दृष्टीने या नियतकालिकाचे मोठे योगदान असलायचे पहावयास मिळते. अनेक लेखक,कवी,समीक्षक यांच्या वेगवेगळ्या विषयाच्या व आशयाच्या साहित्याचा परिचय या नियतकालिकाने समाजाला केलेला आहे. 'ललित' मध्ये नवनवीन लेखकांच्या साहित्य निर्मिती संबंधी तसेच वाङ्मय क्षेत्रातील घडामोडी यांची माहिती वाचकांना या नियतकालिकातून मिळते. तसेच नवीन पुस्तकांविषयी व लेखकांविषयी माहिती मिळते. सन २०१३ साली या नियतकालिकाने सुवर्ण वर्षात पदार्पण



Scanned by CamScanner

केलेले आहे.

**अस्मितादर्श :—**

सन १९६७ साली औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयात लेखक शंकरराव खरात यांच्या हस्ते 'मिलिंद साहित्य परिषेदेचे'उद्घाटन झाले. त्या काळात दलित साहित्याला आपले स्वत:चे असे वेगळे स्थान निर्माण करावयाचे होते. या परिषेदेच्या उद्घाटनामुळे दलित साहित्याची चळवळ निर्माण झाली. डॉ.म.ना. वानखेडे यांच्या संपादकाखाली 'अस्मिता'नावाने त्रैमासिक सुरु झाले. हे मासिक सन १९६७ साली सुरु झाले. 'मिलिंद साहित्य परिषदेचे'मुखपत्र म्हणून हे त्रैमासिक म्हणून प्रकाशित होऊ लागले. केवळ दलितांच्या प्रश्नांना वाचा फोडणारे, सांस्कृतिक पार्श्वभूमी माडणारे नियतकालिक प्रसिद्ध झाले.दलितांचा संघर्ष समाजापर्यंत पोहचवण्याचे काम या नियतकालिकाने केलेले दिसते. कालांतराने या त्रैमासिकाला काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या. त्यामुळे या मासिकाचे नाव 'अस्मितादर्श'ठेवण्यात आले. सन १९६८ पासून हे नियतकालिक डॉ.गंगाधर पानतावणे यांच्या संपादाकत्वा खाली सुरु राहिले. केवळ मानवी मुल्य जोपासण्याचा प्रयत्न या नियतकालिकाने केलेला पहावयास मिळतो. वैज्ञानिक दृष्टीकोनातून समाजाला माहिती देण्याचे या नियतकालिकाने केले. तसेच यामध्ये आंबेडकरी साहित्य प्रकाशित होत.

**वैखरी :—**

नव्या पिढीतील संपादकांनी हे त्रैमासिक सन १९६९ मध्ये सुरु केले. केवळ कला,तत्वज्ञान,सृजन, परीक्षण, साहित्यावरील चर्चा, संशोधनपर लेख यात प्रकाशित केले जात होते.

**अनुष्टुभ:—**

जुलै—ऑगष्ट १९७७ साली 'अनुष्टुभ' नियतकालिक प्रकाशित झाले. याचे संपादक रमेश वरखडे होते. या नियतकालिकातून प्रकाशित होणारे साहित्य हे वाङ्मय विषयक चिंतन करणारे, जीवनाचा शोध घेणारे आहे.कथा,कविता,ललित साहित्य या विषयक नव्या पिढीच्या लेखकांचे विचार यातून प्रकाशित केले जातात.साहित्याला चालना मिळावी म्हणून 'अनुष्टुभ'ने 'रेऊ' कथा स्पर्धा घेतली.या नियतकालिकातून विविध विषयावरचे व प्रसिद्ध लेखक,समीक्षक यांचे लेख प्रकाशित झाले आहेत. उदा. 'साहित्याकृतीतील समाज चित्रण' —म.सु.पाटील, 'साहित्य आणि संस्कृती' — दिगंबर पाध्ये.

**कवितारती:—**

मराठी नियतकालिकातील काव्य या साहित्य प्रकारासाठी वाहिलेले नियतकालिक म्हणजे यकवितारती' होय. हे नियतकलिक सुरुवातीला द्वैमसिक स्वरुपात सन १९८५ साली प्रकाशित झाले. पुरुषोत्तम पाटील यांनी या नियतकालिकाचे संपादन केले होते. या नियतकालिकाने मराठी साहित्य प्रकाराला काव्याची वेगळी ओळख निर्माण करून दिली.काव्याला वाहिलेले मराठीतील पहिले द्वैमसिक म्हणून 'कवितारती' कडे पहिले जाते.यात काव्य,काव्य विषयक माहिती,काव्य समीक्षा ,काव्य विचार आलेले पहावयास मिळते. संवेदनशील विषयावरील कविता यात प्रकाशित झालेल्या आहेत. नवोदित कवींच्या कवितेचा शोध घेण्याच्या दृष्टीने व ज्वलंत विषयावरील कविता प्रेरणा देण्याच्या विचाराने हे नियतकालिक निघालेले दिसते.

**लघुअनियतकालिके :—**

मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रात विविध नियतकालिके निघाली. काही नियतकालिकांनी वाङ्मयीन चळवळी उभारल्या आहेत. त्यामुळे मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रात नवे बदल झालेले दिसतात. नियतकलिकांबरोबर व



Scanned by CamScanner

लघुअनियतकालिके निघाले.सन १९६० नंतर अनियतकालिके व लघुनियतकालिके प्रकाशित होऊ लागली. या नियतकालिकांच्या माध्यमातून मराठी साहित्य विचारात नवीन संकल्पना रुजू लागलेली दिसते. केवळ प्रस्थापित साहित्याचा उदो–उदो न करता या लघुनियतकालीकातून नव्या साहित्य विचारांना प्रेरणा मिळाली. त्यामुळे नव्या पिढीच्या तरुण लेखकांना त्यांनी ठाम मते मांडण्याच्या दृष्टीने या नियतकालिकांचा उदय झालेला असावा असे म्हणता येईल. तसेच समाजातील सर्व स्थरातील लोकांचे प्रश्न, त्यांची दु:खे साहित्याच्या माध्यमातून मांडली गेली. हे साहित्य या नियतकालिकांच्याद्वारे प्रकाशित केले जाऊ लागले. लोकांची होणारी पिळवणूक या साहित्यात मांडली गेली आहे.

सन १९६० ते १९७५ पर्यंत लघुअनियतकालिकाकांच्या चळवळीला मोठ्या प्रमाणात वाङ्मयाच्या क्षेत्रात जोर धरला होता. या चळवळीचा स्त्रोत हा व्यवस्थेच्या विरोधात होता. सर्व सामान्यांवर अन्याय करणारी व्यवस्था नाकारून सर्वांना समान न्याय मिळावा अशी भूमिका लघुअनियतकालिकांची यासाठी अनेक साहित्यिक लेखक एकत्र आले होते. प्रस्थापित वाङ्मयीन नियतकालिके म्हणजेच 'सत्यकथा' व 'मौज' यांच्या साचेबद्ध चौकटीच्या व्यवस्थे विरुद्धचे बंड करण्याचे काम 'वाचा' या प्रकाशन संस्थेने केले. नव्या जाणीवांनी साहित्य लिहिणाऱ्या पिढीला कलावादी, मनोरंजनवादी साहित्य निर्मिती न करता अभिव्यक्तीला साहित्यात महत्त्व देऊन अशा साहित्याचे लिखाण केले जाऊ लागले. हे साहित्य लघुअनियतकालिकात प्रकाशित केले जात होते. त्यामुळे आपली मते मांडून ती इतर लोकांपर्यंत पोहचवता येऊ लागली. मराठी वाङ्मयामध्ये बदललेले चित्रण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहचवण्याचे काम लघुअनियतकालिकांनी केले.

अशाप्रकारे लघुनियतकालिके व लघुअनियतकालिकांच्या वाङ्मयीन उद्दिष्टामधील फरक नीतीन रिंढे यांनी सांगितला आहे. ते म्हणतात, "लघुअनियतकालिकांची चळवळ प्रस्थापितांविरुद्ध संघर्ष करत होती तर आजची लघु (अ) नियतकालिके प्रस्थापित होण्यासाठी झगडत आहेत. हा त्यांच्या उद्दिष्टांमधला फरकच त्यांचे वाङ्मयीन संस्कृतीतले स्थान ठरवतो." सन १९६० नंतरच्या वाङ्मयामध्ये जे बदल झाले ते बदल विविध साहित्य प्रकारातून व प्रवाहातून मांडले गेले. हेच साहित्य नियतकालिकातून प्रकाशित केले जाऊ लागले. त्यामुळे नविन लिहित्या पिढीचे विचार समाजात साहित्यातून रुजू लागलेले दिसते.

**संदर्भ ग्रंथ:–**

१. जोशी प्र.न.:– 'मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास–अर्वाचीन काळ', स्नेहवर्धन प्रकाशन,पुणे, सुधारित आवृत्ती २००६.

२. 'ललित वाङ्मयीन नियतकालिक विशेषांक',मे २०१३.

❑❑❑



Scanned with CamScanner
Scanned by CamScanner